## अर्ज निशाणी क्रमांक ३६ खालील आदेश

**(पारीत केलेला दिनांक १६.०३.२०२४)**

**०१.** वादींनी प्रस्तूत अर्ज **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम २२ नियम ०३** अनुसार मयत प्रतिवादी क्रमांक ०२ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** **वादींचे कथन असे आहे की,** प्रतिवादी क्रमांक ०२ प्रभू नामदेव राठोड हा दिनांक १२.११.२०२१ रोजी मयत झाला आहे. वादींना प्रतिवादी क्रमांक ०२ च्या वारसांविरुध्द दावा चालविण्याचा हक्क अस्तीत्वात राहत आहे. म्हणून वादींनी प्रतिवादी क्रमांक ०२ चे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादींविरुध्द **म्हणणे नाही** असा आदेश पारीत करण्यात येतो.

**०४.** वादींतर्फे विधीज्ज्ञ **श्री. यु. बी. पाटील** यांचा युक्तिवाद ऐकला.

**०५.** दिवाणी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी वादी हे मृतक प्रतिवादी क्रमांक ०२ च्या वारसांविरुध्द दावा पुढे चालवू शकतात. म्हणून वादींना मयत प्रतिवादी क्रमांक ०२ चे वारस प्रतिवादी क्रमांक ०२ च्या जागी दाव्यात सामील करता येईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

### आदेश

**०१.** अर्ज **नि.क्र.३६** मंजूर करण्यात येतो.

**०२.** वादींना मयत प्रतिवादी क्रमांक ०२ चे वारस क्रमांक ०२/१ ते ०२/६ अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

**०३.** वादींनी वादपत्रात दुरुस्ती करुन दरुस्त वादपत्र द्यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Subhash Laxman Phule
Date: 2024.03.16 17:55:44 +0530

**(श्री. एस. एल. फुले.)**

**दिनांकः– १६.०३.२०२४.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण – औसा.** **जिल्हा लातूर.**